Original Article
ISSN (Online): 2582-7472

ShodhKosh: Journal of Visual and Performing Arts
July 2024 5(7), 1746–1756

# ANALYTICAL STUDY OF AUTHORS AND TITLES IN MAHANUBHAV LITERATURE BY LANGUAGE

# महानुभाव साहित्यातील भाषेनुसार लेखक आणि शीर्षक यांचा विश्लेषणात्मक अभ्यास

Prakash N. Mankar [1], D. W. Deote [2]

[1] Research Library & Informatics, (R. T. M. Nagpur University), Nagpur, India
[2] Librarian, Barry. Sheshrao Wankhed College, Mohapa, India

**Corresponding Author**
Prakash N. Mankar,
mankarnprakash@gmail.com

**DOI**
10.29121/shodhkosh.v5.i7.2024.6425

**Funding:** This research received no specific grant from any funding agency in the public, commercial, or not-for-profit sectors.

**Copyright:** © 2024 The Author(s). This work is licensed under a Creative Commons Attribution 4.0 International License.

With the license CC-BY, authors retain the copyright, allowing anyone to download, reuse, re-print, modify, distribute, and/or copy their contribution. The work must be properly attributed to its author.

OPEN ACCESS

## ABSTRACT

**English:** The information collected from the literature sources is available in Marathi, Hindi, English, Sanskrit, Sakal script, Punjabi and Gujarati languages in Maharashtra. Statistical analysis and interpretation of this literature have been done. Accordingly, separate statistical information of the authors and titles of Mahanubhav literature has been prepared and analyzed in descending order and it has been prepared in descending order through analysis tables and graphs. Separate tables and graphs have been prepared and analyzed separately for each language.

**Hindi:** महानुभाव साहित्याचा ग्रन्थथसूचित्मक अभ्यास करण्याकरिता संबंधित साहित्याची संशोधन माहिती संकलित करण्यासाठी महानुभावीय ग्रंथालय आणि महानुभावीय आश्रम येथून माहिती संकलित करण्यात आलेली आहे.
साहित्य ठिकाणाहून संकलित केलेली माहिती मराठी, हिंदी, इंग्रजी, संस्कृत, सकळ लिपी, पंजाबी आणि गुजराती या भाषेमध्ये महाराष्ट्र उपलब्ध आहेत. या साहित्याचे सांख्यिकीय विश्लेषणात्मक आणि विवेचन करण्यात आलेले आहेत. त्यानुसार महानुभाव साहित्यातील लेखक आणि शिर्षक यांची स्वतंत्र सांख्यिकीय माहिती तयार करून उतरत्याक्रमाने विश्लेषण करण्यात आलेले असून ते विष्लेशण तक्ते आणि आलेख याद्वारे उतरत्याक्रमाने तयार करण्यात आलेले आहेत. प्रत्येक भाषेनुसार वेगवेगळे तक्ते आणि आलेख स्वतंत्र तयार करून त्याचे विश्लेषण करण्यात आलेले आहे.

**Keywords:** Mahanubhav, Literature, Lilacharitra, Sutrapath, महानुभाव, साहित्य, लीळाचरित्र, सूत्रपाठ

## 1. प्रस्तावना

### 1.1. महानुभाव तत्वज्ञान

महानुभाव कालीन 12 व्या शतकाकडे जर आपण नजर टाकली तर असे लक्षात येते की, सर्वत्र अंधश्रध्दा, पाखंडिपणा, यज्ञयाग, जपतप, वर्णभेद, जातीय भेदभाव, स्पृष्य-अस्पृष्य भेद, व स्त्री-पुरुष भेदभाव समाजात पराकोटीला पोहचलेले होते. व्रतवैकल्य, होड, जुगार हे करीत माणूस अधःपतनाकडे जावून पशुतुल्य वर्तन करीत होता. चातुर्वण्र्याची मिरासदारी वाढली होती.

अषा काळात श्री चक्रधरांनी ज्ञान आणि भक्ती याचा समन्वय साधून द्वैती (मानवतावादी) तत्वज्ञानाचा प्रसार केला. यालाच पुढे महानुभावीय तत्वज्ञान म्हणून संबोधण्यात आले. महानुभावीय तत्वज्ञान पुर्णतः अवैदिक असून मुर्तीपुजा, अंधश्रध्दा, व्रतवैकल्य हया सर्वांना महानुभावांच्या तत्वज्ञानात कुठेही थारा नाही.

या पंथाचे प्रमुख ध्येय जीवाच्या उन्नतीचे व उद्धारण्याचे आहे. सूत्रपाठ या ग्रंथातुन महानुभावांचे सारे तत्वज्ञान विशद झाले आहे. हा पंथ द्वैती मताचा आहे. ‘देवता या नित्यबध्द असून जीव हा बंधमुक्त आहे. परमेश्वर नित्यमुक्त आहे. तर प्रपंच अनित्य आहे.’ असे या तत्वज्ञानाचे सूत्र आहे. परमेश्वर हा नित्यमुक्त असल्यामुळे फक्त तोच जीवाचा उध्दार करू शकतो. देवतांना मात्र तो अधिकार नाही कारण त्या नित्यबध्द आहेत.

श्री चक्रधरांनी आत्मज्ञान, भक्ती आणि ईश्वरकृपा यांना महत्व दिले आहे. ईश्वराचे खरे स्वरूप ज्ञानामुळेच ओळखता येते. ज्ञानमार्ग व भक्तीमार्ग हे मोक्षप्राप्तीचे दोन मार्ग होत. ”बाई भावो अपूर्व की“, शषा षब्दात त्यांनी जरी भक्ती मार्गाचे श्रेष्ठत्व प्रतिपादन केले असले, तरी ज्ञान व भक्ती यांचा समन्वय साधणारा हा पंथ आहे. साधकाला ज्ञान व भक्ती या दोन्ही गोष्ठी तेवढयाच आवष्यक आहेत.

महानुभाव त्रेतायुगात श्रीदत्तावतार, द्वापारयुगात श्रीकृशणावतार आणि कलियुगात श्रीचक्रपाणी, श्रीगोविंदप्रभू व श्रीचक्रधर असे परमेश्वर अवतार मानतात. महानुभाव मंडळी फक्त पंचकृशणाचीच वचने प्रमाण मानतात. ते गुरू मानतात, पण गुरूचे अवास्तव स्तोम माजवित नाहीत, गुरूवर प्रिती करावी पण त्याला परमेश्वर समजू नये असे म्हणतात.

## 2. महानुभावांचा आचारधर्म

महानुभाव पंथ हा साधकांचा पंथ असल्यामुळे या पंथातील शिष्यसाठी असणारे नियम आणि आचारधर्म दिसायला सोपे पण आचरणासाठी फारच कठीण व कडक आहेत. संन्याषाने नित्य भ्रमंती, भिक्षा भोजन करावे. एकांतवास पत्करून परमेश्वरचे नामस्मरण करावे असा पंथाचा आचार आहे. जीवेश्वर भेद, भक्तीयोग, संन्यास व अहिंसा या चार प्रमुख तत्वांच्या आधारावरच महानुभावांचा आचारधर्म उभा आहे. नुसते वैराग्य त्यांना मान्य नाही पण ज्ञानयुक्त वैराग्य त्यांना हवे. ‘ज्ञानेविन वैराग्य ते काई करावे बापेया’ असा त्यांचा प्रष्न आहे. परंतु वैराग्याचे प्रदर्षन मात्र ते करत नाही.

भिक्षेसंबंधी देखील काही नियम आहेत. भिक्षा करतांना वर्णभेद व जातीभेद पाळू नये. भिक्षा करतांना एकच घर निवडू नये. ओळखीच्या व तोरण लावलेल्या घरी जाऊ नये. भिक्षेचे अन्न ग्रहण करतांना ते चवीने खाऊ नये. भोजनाचा उद्देष फक्त देह उभा ठेवणे हाच असावा. ‘प्राणासी आहारू देयाचा, इंद्रियासी नेदावा’ उपदेश आहे. परनिंदे पेक्षा झोप बरी असे ते म्हणतात. काम, राग, द्वेष, क्रोध, मद, मत्सर यांचा त्याग म्हणजे संन्यास.

## 3. महानुभावांची साहित्यसेवा

पंथनिष्ठा हीच महानुभावीय वाड्ःमयाची खरी प्रेरणा आहे. गद्य आणि पद्य या दोन्ही माध्यमातून जाणीवपुर्वक निर्मिती त्यांनी केली. संस्कृतचा प्रभाव त्या काळात होता, त्या काळात श्रीचक्रधर व श्री नागदेवाचार्य यांनी मात्र मराठीतच ग्रंथरचना करण्यास आपल्या शिष्यांना सांगितले. कारण त्यावेळेसची प्रचलित भाशा ही मराठी होती. संस्कृत फक्त ब्राम्हाणांनाच येत होते. वर्णभेद, जातीभेद, अंधश्रध्दा व धर्मरूढीत समाज फार भरकटलेला व दबलेला होता. जन सामान्यांना मराठीच समजत असल्यामुळे मराठीचा आग्रह त्यावेळेस धरल्या गेला कारण जर संस्कृतमध्ये षास्त्र सांगितले असते तर ते सर्व सामान्यांपर्यत पोहचले नसते. म्हणून मराठीचा आग्रह त्यावेळेस केला गेला. ती त्यावेळेसच्या काळाची गरज होती. भाषा महत्वाची नसते, ती समजणे जरूरीची असते. त्यामुळे प्रथम ग्रंथरचना मराठी मध्ये झालेली आहे.

## 3.1. ग्रंथसुचित्मक अभ्यास

या संशोधनामध्ये मराठी, हिंदी, इंग्रजी, संस्कृत, सकळ लिपी, पंजाबी व गुजराती भाषेत महाराष्ट्र उपलब्ध असलेल्या महानुभाव साहित्याच्या प्रकाशित भाषेनुसार ग्रंथसूचित्मक अभ्यास करण्यात आलेला आहे.

## 4. संशोधन समस्येच्या अभ्यासाची गरज

महानुभाव साहित्यात साहित्य निर्मिती मोठया प्रमाणात झाली आहे. या साहित्यात वाड्ःमय प्रकारामध्ये ग्रंथ, हस्तलिखिते, दृष्टांतपाठ, लिळा इत्यादीमध्ये विखुरलेले आहे. या साहित्याचा वाचक व संशोधन करणा-याची संख्या मोठी आहे.

संशोधन कार्यामुळे महानुभाव साहित्याची महाराष्ट्र राज्यात काय स्थिती आहे तसेच त्यांची संख्या कषी वाढली आहे. या संबंधी माहिती भविष्यकालीन संशोधकांना मिळावी. यासाठी सदर संशोधन समस्येच्या अभ्यासाची गरज आहे.

## 5. विषयाची व्याप्ती

महानुभाव साहित्याची सुरूवात लीळाचरित्र हा मराठी ग्रन्थ म्हाइंभट व नागदेवाचार्यांनी सन 1197 ते सन 1198 पर्यत पुर्ण करून संपुर्ण लीळाचरित्र सन 1200 मध्ये पूर्ण केले असावे. या ग्रंथानंतर अनेक साधकाकडून मोठया प्रमाणात सकळ सांकेतीक लिपी मधून हस्तलिखिते तयार करण्यात आले. ते हस्तलिखिते आजही तत्वज्ञानाचे कार्य करित आहे. आज आठशे वर्शात मोठया प्रमाणात महानुभाव साहित्य निर्माण होवून प्रकाशित झालेले आहे. त्या साहित्यात ग्रंथ, हस्तलिखिते, दृष्टांतपाठ, लिळा यांच्या माध्यमातुन मोठया प्रमाणावर साहित्य लिखान झालेले आहे.

## 6. उद्देश

महानुभाव साहित्याचा ग्रंथसुचित्मक अभ्यास या विषयावर अध्ययन करण्यासाठी महाराष्ट्र राज्य निवडण्यात करण्यात आलेले आहे. अध्ययन उद्देश खालील प्रमाणे आहेत.

1) भाषेनुसार महाराष्ट्र राज्यात उपलब्ध असलेल्या प्रकाशित महानुभाव साहित्याचा सुचीबध्द षोध घेणे.
2) महाराष्ट्र उपलब्ध असलेले ग्रन्थ, हस्तलिखिते, दृश्टांतपाठ, लिळा आणि इतर साहित्य प्रकारामध्ये प्रकाशित झालेल्या महानुभाव साहित्याचा सुचीबध्द शोध घेणे.
3) विदर्भ व उर्वरीत महाराष्ट्र प्रकाशित झालेल्या महानुभाव साहित्याचा सुचीबध्द शोध घेणे.
4) महाराष्ट्र लेखक आणि प्रकाशनुसार प्रकाशित झालेले महानुभाव साहित्य कोणते व किती आहे यांचा सुचीबध्द शोध घेणे.
5) दर 10 वर्षात महाराष्ट्र उपलब्ध असलेल्या व प्रकाशित झालेल्या महानुभाव साहित्यामध्ये होणारी वाढ निश्चित करणे.

## 7. गृहितके

1) महानुभाव साहित्याची वाढ आणि विकास निरंतर होत आहे.
2) महानुभाव साहित्याचे प्रबोधन व प्रकाषन महानुभाव आश्रमातून जास्तीत जास्त होत आहेत.
3) महानुभाव साहित्याचे जास्तीत जास्त ग्रंथ महाराश्ट्रीयन लेखकांचे आहेत.
4) महानुभाव आश्रमात राहणारे साधक वर्ग स्त्री/पुरुष यांनी आपले अध्ययनातुन भरपुर साहित्य प्रकाशित केले आहे.

## 8. संशोधन पध्दती

सदर अध्ययनासाठी ऐतिहासिक पध्दती, विष्लेशणात्मक पध्दती आणि निरिक्षणात्मक पध्दती यांचा वापर करून महानुभाव ग्रंथालय, आश्रम ग्रंथालय, बुक स्टॉल ई. ठिकाणी प्रत्यक्ष भेट देवून साहित्याचे स्वलिखित निरिक्षण या साधनांद्वारे माहिती गोळा करण्यात आली असून प्राप्त माहितीचे विश्लेषण करून निष्कर्ष काढण्यात आलेले आहेत.

## 9. माहिती संकलन आणि विश्लेषण

सदर प्रकरणात महानुभाव साहित्याचे संशोधन करण्याकरिता महानुभाव ग्रंथालय आणि महानुभाव आश्रम येथून माहिती संकलीत करण्यात आलेली आहे. ती येणे प्रमाणे.

1) श्री गोपीराज महानुभाव ग्रंथ संग्रहालय, प्राचीन मराठी साहित्याचे अध्ययन तथा संशोधन केंद्र, रिध्दपूर (काशी) जिल्हा अमरावती
2) श्री गोविंदप्रभू राजमठ संस्थान, रिध्दपूर (काशी) जिल्हा अमरावती
3) आद्यगुरू महानुभाव मठ, वलगाव जिल्हा अमरावती
4) श्री चक्रधरस्वामी शांतीधाम, सालबर्डी जिल्हा अमरावती
5) महानुभाव अध्यासन केंद्र, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.
6) श्री गोविंदप्रभू सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय, अमरावती
7) पांचजन्य प्रकाशन आणि ग्रंथालय, श्रीक्षेत्र जाळीचा देव जिल्हा जालना

8) राऊळ प्रकाशन आणि श्रीकृश्ण मंदिर, महानुभाव आश्रम, पैठण, रोड, संभाजीनगर (औरंगाबाद)
9) महानुभाव शिक्षण संस्था, वांबोरी जिल्हा नगर (अहमदनगर)
10) पंडित म्हाइंभट संशोधन ग्रंथालय, सर्वज्ञ विद्यापीठ, माळवाडगांव जिल्हा अहिल्यानगर (अहमदनगर)
11) श्रीक्षेत्र राजमठ, डोमेग्राम जिल्हा अहिल्यानगर (अहमदनगर)

वरील पंथीय साहित्य ठिकाणाहून संकलित केलेल्या माहितीचे सांख्यिकीय विश्लेशण आणि विवेचन करण्यात आलेले आहे. त्याच बरोबर त्यावरून तक्ते आणि आलेख तयार करण्यात आलेले आहेत. प्रस्तुत प्रकरणात संशोधन कार्यासाठी संकलीत केलेल्या साहित्यावरून माहितीचे पृथक्करण, विवेचन, आलेख, सांख्यिकीय, विश्लेशण करून तालिका व आलेख त्याचबरोबर तुलनात्मक सांख्यिकीय विश्लेशण हे तथ्य माहिती संकलनाच्या आधारावर करण्यात आले आहे. माहिती विश्लेशण हे एकुण 7 भाषेनुसार करण्यात आले असून प्रत्येक भाषे अतंर्गत साहित्य प्रकार, लेखकाने लिहिलेल्या संख्येनुसार, लेखाच्या शीर्षकानुसार, 10 वर्शाच्या कालखंडानुसार, प्रकाषकाप्रमाणे तसेच प्रकाषन स्थळ इ. प्रमाणे करण्यात आलेले आहे.

**तक्ता क्र. 1** महानुभाव साहित्यातील भाषेनुसार प्रकाशित झालेल्या पुस्तकांचा गोषवारा

| अ.क्र. | भाषा | पुस्तके संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | मराठी | २०२० | ८२.३९ |
| २ | हिंदी | ३१८ | १२.९७ |
| ३ | इंग्रजी | ५६ | २.२८ |
| ४ | संस्कृत | ४६ | १.८८ |
| ५ | सकळ लिपी | ८ | ०.३२ |
| ६ | पंजाबी | २ | ०.०८ |
| ७ | गुजराथी | २ | ०.०८ |
| **एकुण पुस्तके** | | **२४५२** | **१००.००** |

वरील तक्ता क्र. 1 प्रमाणे महानुभाव साहित्य अनेक लेखकांनी 7 भाषेमध्ये प्रकाशित केलेले असून महाराष्ट्र एकुण 2452 पुस्तके उपलब्ध आहेत. त्यामध्ये मराठी भाशेत सर्वाधिक 2020 (82.39टक्के) पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. तर हिंदी भाषेत 318 (12.97टक्के) पुस्तके, इंग्रजी भाषेत 56 (2.28टक्के) पुस्तके, संस्कृत भाषेत 46 (1.88टक्के) पुस्तके, सकळ लिपी भाषेत 8 (0.32टक्के), पंजाबी भाषेत 2 (0.08टक्के) तर गुजराती भाषेत 2 (0.08टक्के) पुस्तके प्रकाशित झालेली आहे.

**तक्ता क्र. 2** मराठी भाषेनुसार महानुभाव साहित्य लेखकांचा गोषवारा

| अ. क्र. | लेखक/संपादक | लेखक संख्या | पुस्तके संख्या | एकुण पुस्तके | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | बाभूळगावकर भोजराज उपाध्य बा.भो. शास्त्री | १ | ८६ | ८६ | ४.२६ |
| २ | पंजाबी माधवराव | १ | ६९ | ६९ | ३.४२ |
| ३ | कोलते वि.भि. | १ | ६७ | ६७ | ३.३२ |
| ४ | आराध्ये राजधर पंतबाबा उपाध्य सोनपेठकर महंत | १ | ३८ | ३८ | १.८९ |
| ५ | खामनीकर हंसराज | १ | ३५ | ३५ | १.७४ |
| ६ | तुळपुळे शं.गो. | १ | ३२ | ३२ | १.५९ |
| ७ | चिरडे बाळकृष्ण उपाघ्य गायकवाड बा. ब. | १ | ३१ | ३१ | १.५४ |
| ८ | कृष्णदास महानुभाव शास्त्री | १ | २८ | २८ | १.३९ |
| ९ | नागपूरे पुरूषोत्तम | १ | २७ | २७ | १.३४ |
| १० | अंजनगावकर बाळकृष्ण | १ | २३ | २३ | १.१४ |
| ११ | मेश्राम रा.बो. | १ | २२ | २२ | १.०९ |
| १२ | श्रीदेवदत्त आश्रम संपादक | १ | २० | २० | ०.९९ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १३ | कुलकर्णी व.दि. | २ | १८ | ३६ | १.७९ |
| १४ | देशपांडे ब्रम्हानंद | | | | |
| १५ | आवलगावकर रमेश वामन. | १ | १७ | १७ | ०.८५ |
| १६ | अडसोड अण्णासाहेब. | ४ | १६ | ६४ | ३.१७ |
| १७ | कळमकर मनोहर महंत | | | | |
| १८ | नरेंद्रमुनी महानुभाव | | | | |
| १९ | पंजाबी विद्याधर | | | | |
| २० | पंजाबी कृष्णराज शास्त्री | १ | १५ | १५ | ०.७५ |
| २१ | कोळपकर मुरलीधर महानुभाव | १ | १४ | १४ | ०.६९ |
| २२ | देशपांडे वामन नारायण | ४ | १३ | ५२ | २.५९ |
| २३ | बाळकृष्ण महानुभाव शास्त्री | | | | |
| २४ | भक्तीवेदांन्त प्रभुपाद | | | | |
| २५ | शेवलीकर दा.गी | | | | |
| **अ. क्र.** | **लेखक/संपादक** | **लेखक संख्या** | **पुस्तके संख्या** | **एकुण पुस्तके** | **टक्केवारी** |
| २६ | नेने हरी नारायण | १ | १२ | १२ | ०.५९ |
| २७ | आराध्ये मुरलीधर शास्त्री | ३ | ११ | ३३ | १.६३ |
| २८ | दत्तराज बालमुकुंद शास्त्री | | | | |
| २९ | दाते यशवंत रामकृष्ण संपादक | | | | |
| ३० | श्रीब्रम्हविद्या संशोधन आणि संपादन संस्था | २ | १० | २० | ०.९९ |
| ३१ | लासुरकर बाबा शास्त्री. | | | | |
| ३२ | कुंदप कन्हैया | ४ | ९ | ३६ | १.७९ |
| ३३ | पठाण यू.म. | | | | |
| ३४ | बिडकर बाबासाहेब | | | | |
| ३५ | भावे विनायक लक्ष्मण | | | | |
| ३६ | वेगवेगळया लेखकांने प्रकाशित केलेल्या पुस्तकांची संख्या | १२ | ८ | ९६ | ४.७५ |
| ३७ | | ७ | ७ | ४९ | २.४२ |
| ३८ | | १२ | ६ | ७२ | ३.५६ |
| ३९ | | १७ | ५ | ८५ | ४.२० |
| ४० | | ३१ | ४ | १२४ | ६.१३ |
| ४१ | | ३९ | ३ | ११७ | ५.३८ |
| ४२ | | ११५ | २ | २३० | ११.३८ |
| ४३ | | ४७० | १ | ४७० | २३.६३ |
| **एकुण पुस्तके** | | | | **२०२०** | **१००.००** |

वरील तक्ता क्र. 2 प्रमाणे मराठी भाषेनुसार महानुभाव साहित्यातील वेगवेगळया लेखकांनी महानुभाव साहित्य प्रकाशित केलेली आहे. एकुण 2452 साहित्यपैकी मराठी भाषेनुसार सर्व लेखकांनी 2020 (82.39टक्के) पुस्तके प्रकाशित केलेली आहे. यामध्ये सर्वाधिक बाभूळगावकर भोजराज उपाघ्य बा.भो. शास्त्री यांनी यांनी 86 (4.26टक्के) पुस्तके तर पंजाबी माधवराव यांनी 69 (3.42टक्के) पुस्तके, कोलत वि.भि. यांनी 67 (3.32टक्के) पुस्तके, आराध्ये राजधर पंतबाबा उपाघ्य सोनपेठकर महंत यांनी 38 (1.89टक्के)पुस्तके, खामणीकर हंसराज यांनी 35 (1.74टक्के) आणि ईतर 703 लेखकांनी पुस्तके प्रकाशित केलेली आहे.

**तक्ता क्र. 3** हिंदी भाषेनुसार महानुभाव साहित्य लेखकांचा गोशवारा

| अ.क. | लेखक/संपादक | लेखक संख्या | पुस्तके संख्या | एकुण पुस्तके | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | गीता प्रेस संपादक | १ | २७ | २७ | ८.४९ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | दत्तराज बालमुकुंद शास्त्री महन्त | १ | २३ | २३ | ७.२३ |
| ३ | जयदयाल गोयन्दका संपादक | १ | १८ | १८ | ५.६६ |
| ४ | तलेगांवकर तपस्वीनद्र शास्त्री महन्त | २ | १७ | ३४ | १०.६९ |
| ५ | रामसुखदास स्वामी संपादक | | | | |
| ६ | बालमुकुन्द शास्त्री | १ | १५ | १५ | ४.७१ |
| ७ | बिडकर बाबासाहेब | १ | ११ | ११ | ३.४९ |
| ८ | यशराज शास्त्री | १ | १० | १० | ३.१५ |
| ९ | कृष्णमुनि प्रभाकर संपादक | ३ | ९ | २७ | ८.४९ |
| १० | जयंतिराज महानुभाव | | | | |
| ११ | शाहपुरकर सनातनमुनी | | | | |
| १२ | नरूला सुभाष | १ | ६ | ६ | १.८८ |
| १३ | नगेन्द्र मुनी | २ | ५ | १० | ३.१४ |
| १४ | परमानन्ददास महानुभाव महन्त | | | | |
| १५ | प्रभूप्रसाद प्रकाशन संपादक | ७ | ४ | २८ | ८.८० |
| १६ | आराध्ये मुकुंदराज | ३ | ३ | ९ | २.८४ |
| १७ | मुकुन्दराज महंत | | | | |
| १८ | साधाबाई महानुभाव | | | | |
| १९ | वेगवेगळ्या लेखकांने प्रकाशित केलेल्या पुस्तकांची संख्या | १० | २ | २० | ६.२८ |
| २० | | ८० | १ | ८० | २५.१५ |
| **एकुण पुस्तके** | | | | **३१८** | **१००.००** |

वरील तक्ता क्र. 3 प्रमाणे हिंदी भाषेनुसार महानुभाव साहित्यातील वेगवेगळया लेखकांनी महानुभाव साहित्य प्रकाशित केलेली आहे. एकुण 2452 साहित्यपैकी हिंदी भाषेनुसार सर्व लेखकानीं 318 (12.97टक्के) पुस्तके प्रकाशित केलेली आहे. यामध्ये सर्वाधिक गीता प्रेस संपादक यांनी 27 (8.49टक्के) पुस्तके तर दत्तराज बालमुकुंद शास्त्री महन्त यांनी 23 (7.23टक्के), जयदयाल गोयन्दका संपादक यांनी 18 (5.66टक्के), तलेगांवकर तपस्वीनद्र शास्त्री महन्त आणि रामसुखदास स्वामी संपादक यांनी प्रत्येकी 17 (5.35टक्के) एकुण मिळून 34 (10.69टक्के), खामणीकर हंसराज यांनी 35 (1.74टक्के) आणि ईतर 90 लेखकांनी पुस्तके प्रकाशित केलेली आहे.

**तक्ता क्र. 4** इंग्रजी भाषेनुसार महानुभाव साहित्य लेखकांचा गोषवारा

| अ.क्र. | लेखक/संपादक | लेखक संख्या | पुस्तक संख्या | एकुण पुस्तके | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | Jadhav B. G. | १ | ११ | ११ | १९.६५ |
| २ | Feldhaus Anne. | २ | ३ | ६ | १०.७१ |
| ३ | Raeside M.P. | | | | |
| ४ | Gita. Paas Edi. | ३ | २ | ६ | १०.७१ |
| ५ | Ramsukhdas Swami | | | | |
| ६ | Sarvandhya University | | | | |
| ७ | वेगवेगळ्या लेखकांने प्रकाशित केलेल्या पुस्तकांची संख्या | ३३ | १ | ३३ | ५८.९३ |
| **एकुण पुस्तके** | | | | **५६** | १००.०० |

वरील तक्ता क्र. 4 प्रमाणे इंग्रती भाषेनुसार महानुभाव साहित्यातील वेगवेगळया लेखकांनी महानुभाव साहित्य प्रकाशित केलेली आहे. एकुण 2452 साहित्यपैकी इंग्रजी भाषेनुसार सर्व लेखकांनी 56 (2.28टक्के) पुस्तके प्रकाशित केलेली आहे. यामध्ये सर्वाधिक Jadhav B. G. यांनी 11 (19.65टक्के) पुस्तके तर Feldhaus Anne and Raeside M.P. यांनी प्रत्येकी 3 (5.35टक्के) एकुण मिळून 6 (10.71टक्के), Gita. Paas; Edi., Ramsukhdas Swami and Sarvandhya University यांनी प्रत्येकी 2 (3.57टक्के) एकुण मिळून 6 (10.71टक्के) आणि ईतर 33 लेखकांनी पुस्तके प्रकाशित केलेली आहे.

**तक्ता क्र. 5** संस्कृत भाषेनुसार महानुभाव साहित्य लेखकांचा गोशवारा

| अ.क. | लेखक/संपादक | लेखक संख्या | पुस्तके संख्या | एकुण पुस्तके | टककेवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | विद्वांसबाबा | २ | ३ | ६ | १३.०४ |
| २ | शेवलीकर मनोहर शास्त्री | | | | |
| ३ | गीता प्रेस संपादक | ३ | २ | ६ | १३.०४ |
| ४ | देशपाडे ब्रम्हानंद | | | | |
| ५ | धर्माधिकारी रामकृष्ण मोरेश्वर | | | | |
| ६ | वेगवेगळया लेखकांने प्रकाशित केलेल्या पुस्तकांची संख्या | ३४ | १ | ३४ | ७३.९२ |
| **एकुण पुस्तके** | | | | **४६** | **१००.००** |

वरील तक्ता क्र. 5 प्रमाणे संस्कृत भाषेनुसार महानुभाव साहित्यातील वेगवेगळया लेखकांनी महानुभाव साहित्य प्रकाशित केलेली आहे. एकुण 2452 साहित्यपैकी संस्कृत भाषेनुसार सर्व लेखकांनी 46 (1.88टक्के) पुस्तके प्रकाशित केलेली आहे. यामध्ये सर्वाधिक विद्वांसबाबा आणि शेवलीकर मनोहर शास्त्री यांनी प्रत्येकी 3 (6.52टक्के) एकुण मिळून 6 (13.04टक्के) पुस्तके तर गीता प्रेस संपादक देशपाडे ब्रम्हानंद आणि धर्माधिकारी रामकृष्ण मोरेश्वर यांनी प्रत्येकी 2 (4.34टक्के) एकुण मिळून 6 (13.04टक्के) तसेच ईतर 34 लेखकांनी पुस्तके प्रकाशित केलेली आहे.

**तक्ता क्र. 6** सकळ लिपी भाषेनुसार महानुभाव साहित्य लेखकांचा गोषवारा

| अ.क. | लेखक/संपादक | लेखक संख्या | पुस्तके संख्या | एकुण पुस्तके | टककेवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | आराध्ये राजधर | १ | २ | २ | २५.०० |
| २ | कोळपकर मुरलीधर महानुभाव | ६ | १ | ६ | ७५.०० |
| ३ | पाटील विनाय त्र्यंबक | | | | |
| ४ | लोणारकर धनंजय आचार्य | | | | |
| ५ | युवराज शास्त्री | | | | |
| ६ | विद्वास | | | | |
| ७ | विजयराज शास्त्री | | | | |
| **एकुण पुस्तके** | | | | ८ | **१००.००** |

वरील तक्ता क्र. 6 प्रमाणे सकळ लिपी भाषेनुसार महानुभाव साहित्यातील वेगवेगळया लेखकांनी महानुभाव साहित्य प्रकाशित केलेली आहे. एकुण 2452 साहित्यपैकी सकळ लिपी भाषेनुसार सर्व लेखकांनी 8 (0.32टक्के) पुस्तके प्रकाशित केलेली आहे. यामध्ये सर्वाधिक आराध्ये राजधर यांनी 2 (25.00टक्के) पुस्तके तर कोळपकर मुरलीधर महानुभाव, पाटील विनाय त्र्यंबक, लोणारकर धनंजय आचार्य, युवराज शास्त्री, विद्वास आणि विजयराज शास्त्री यांनी प्रत्येकी 1 (12.50टक्के) एकुण मिळून 6 (75.00टक्के) पुस्तके प्रकाशित केलेली आहे.

**तक्ता क्र. 7** पंजाबी भाषेनुसार महानुभाव साहित्य लेखकांचा गोषवारा

| अ.क. | लेखक/संपादक | लेखक संख्या | पुस्तके संख्या | एकुण पुस्तके | टककेवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | आराध्ये मुकंदराज | १ | १ | १ | ५०.०० |
| २ | कृष्णदास महानुभाव संपादक | १ | १ | १ | ५०.०० |
| **एकुण पुस्तके** | | | | **२** | **१००.००** |

वरील तक्ता क्र. 7 प्रमाणे पंजाबी भाषेनुसार महानुभाव साहित्यातील वेगवेगळया लेखकांनी महानुभाव साहित्य प्रकाशित केलेली आहे. एकुण 2452 साहित्यपैकी पंजाबी भाषेनुसार लेखकांनी 2 (0.08टक्के) पुस्तके प्रकाशित केलेली आहे. यामध्ये आराध्ये मुकंदराज आणि कृष्णदास महानुभाव संपादक यांनी प्रत्येकी 1 (50.00टक्के) एकुण मिळून 2 (100.00टक्के) पुस्तके प्रकाशित केलेली आहे.

**तक्ता क्र. 8** गुजराती भाषेनुसार महानुभाव साहित्य लेखकांचा गोषवारा

| अ.क. | लेखक/संपादक | लेखक संख्या | पुस्तके संख्या | एकुण पुस्तके | टककेवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | अंकुलनेरकर नरेंद्रमुनि | १ | १ | १ | ५०.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | खेर राजेंद्र | १ | १ | १ | ५०.०० |
| | **एकुण पुस्तके** | | | **२** | **१००.००** |

वरील तक्ता क्र. 8 प्रमाणे गुजराती भाषेनुसार महानुभाव साहित्यातील वेगवेगळया लेखकांनी महानुभाव साहित्य प्रकाशित केलेली आहे. एकुण 2452 साहित्यपैकी गुजराती भाषेनुसार लेखकांनी 2 (0.08टक्के) पुस्तके प्रकाशित केलेली आहे. यामध्ये अंकुलनेरकर नरेंद्रमुनि आणि खेर राजेंद्र यांनी प्रत्येकी 1 (50.00टक्के) एकुण मिळून 2 (100.00टक्के) पुस्तके प्रकाशित केलेली आहे.

**तक्ता क्र. 9** मराठी भाषेनुसार महानुभाव साहित्य शिर्षकांचा गोषवारा

| अ.क्र. | ग्रंथांचे शिर्षक | शिर्षक संख्या | पुस्तके संख्या | एकुण पुस्तके | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्रीमद्‌भगवद्‌गीता | १ | ५४ | ५४ | २.६८ |
| २ | स्मृतिस्थळ | १ | १९ | १९ | ०.९४ |
| ३ | दृष्टांतपाठ | १ | १७ | १७ | ०.८४ |
| ४ | रूक्मिणी स्वयंवर | १ | १४ | १४ | ०.७० |
| ५ | सुत्रपाठ | १ | १२ | १२ | ०.५९ |
| ६ | श्रीगोविदप्रभू चरित्र | १ | ११ | ११ | ०.५४ |
| ७ | स्थानदर्शन | १ | ९ | ९ | ०.४४ |
| ८ | वेगवेगळया शिर्षका नुसार प्रकाशित झालेल्या पुस्तकांची संख्या | ७ | ८ | ५६ | २.७८ |
| ९ | | ३ | ७ | २१ | १.०३ |
| १० | | ५ | ६ | ३० | १.४८ |
| ११ | | २१ | ५ | १०५ | ५.२० |
| १२ | | २२ | ४ | ८८ | ४.३५ |
| १३ | | ५२ | ३ | १५६ | ७.७२ |
| १४ | | १५९ | २ | ३१८ | १५.७५ |
| १५ | | १११० | १ | १११० | ५४.९६ |
| | **एकुण पुस्तके** | | | **२०२०** | **१००.००** |

वरील तक्ता क्र. 9 प्रमाणे मराठी भाषेनुसार महानुभाव साहित्यातील वेगवेगळया षिर्शकानुसार महानुभाव साहित्य प्रकाशित केलेली आहे. एकुण 2452 साहित्यपैकी मराठी भाषेनुसार सर्व शीर्षकांची 2020 (82.39टक्के) पुस्तके प्रकाशित केलेली आहे. यामध्ये सर्वाधिक श्रीमद्‌भगवद्‌गीता 54 (2.68टक्के) पुस्तके तर स्मृतिस्थळ 19 (0.94टक्के), दृष्टांतपाठ 17 (0.84टक्के), रूक्मिणी स्वयंवर 14 (0.70टक्के), सुत्रपाठ 12 (0.59टक्के) आणि ईतर अनेक शीर्षकनुसार पुस्तके प्रकाशित केलेली आहे.

**तक्ता क्र. 10** हिंदी भाषेनुसार महानुभाव साहित्य शिर्षकांचा गोषवारा

| अ.क्र. | ग्रंथांचे शिर्षक | शिर्षक संख्या | पुस्तके संख्या | एकुण पुस्तके | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्रीमद्‌भगवद्‌गीता | १ | २२ | २२ | ६.९१ |
| २ | श्रीमद्‌भगवद्‌गीता सरल हिंदी | १ | ९ | ९ | २.८३ |
| ३ | श्रीचक्रधरचरित्र | १ | ६ | ६ | १.८९ |
| ४ | भगवद्‌गीता सरल हिंदी | १ | ४ | ४ | १.२५ |
| ५ | जयकृष्णी पंथ | ४ | ३ | १२ | ३.७८ |
| ६ | भगवद्‌गीता | | | | |
| ७ | भजन | | | | |
| ८ | रूक्मिणी स्वयंवर हिंदी | | | | |
| ९ | वेगवेगळया शिर्षका नुसार प्रकाशित झालेल्या पुस्तकांची संख्या | २६ | २ | ५२ | १६.३५ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १० | | २१३ | १ | २१३ | ६६.९९ |
| | **एकुण पुस्तके** | | | **३१८** | **१००.००** |

वरील तक्ता क्र. 10 प्रमाणे हिंदी भाषेनुसार महानुभाव साहित्यातील वेगवेगळया शिर्षकाप्रमाणे महानुभाव साहित्य प्रकाशित केलेली आहे. एकुण 2452 साहित्यपैकी हिंदी भाषेनुसार सर्व शिर्षकांची 318 (12.97टक्के) पुस्तके प्रकाशित केलेली आहे. यामध्ये सर्वाधिक श्रीमद्दभगवद्दगीता 22 (6.91टक्के) पुस्तके तर श्रीमद्दभगवद्दगीता सरल हिंदी 9 (2.83टक्के), श्रीचक्रधरचरित्र 6 (1.89टक्के), भगवद्गीता सरल हिंदी 4 (1.25टक्के), जयकृष्णी पंथ, श्रीमद्दभगवद्दगीता आणि भजन यानुसार 3 (0.94टक्के) एकुण मिळून 12 (3.78टक्के) आणि ईतर अनेक शिर्षकनुसार पुस्तके प्रकाशित केलेली आहे.

**तक्ता क्र. 11** इंग्रजी भाषेनुसार महानुभाव साहित्य शिर्षकांचा गोषवारा

| अ.क्र. | ग्रंथांचे शिर्षक | शिर्षक संख्या | पुस्तके संख्या | एकुण पुस्तके | टककेवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | Shrimadbhagwadgita | १ | १८ | १८ | ३२.१४ |
| २ | Leelacharitra | २ | ३ | ६ | १०.७२ |
| ३ | The Bhagavad Geeta | | | | |
| ४ | Gadyaraja | २ | २ | ४ | ७.१४ |
| ५ | Sarvadnya and his Philosophy | | | | |
| ६ | The Religious System of the Mahanubhav sut | २८ | १ | २८ | ५०.०० |
| | **एकुण पुस्तके** | | | **५६** | **१००.००** |

वरील तक्ता क्र. 11 प्रमाणे इंग्रजी भाषेनुसार महानुभाव साहित्यातील वेगवेगळया शिर्षकाप्रमाणे महानुभाव साहित्य प्रकाशित केलेली आहे. एकुण 2452 साहित्यपैकी इंग्रजी भाषेनुसार सर्व शिर्षकाँची 56 (2.28टक्के) पुस्तके प्रकाशित केलेली आहे. यामध्ये सर्वाधिक Shrimadbhagwadgita 18 (32.14टक्के) पुस्तके तर Leelacharitra The Bhagavad Geeta या शिर्षकाँची प्रत्येकी 3 (5.36टक्के) एकुण मिळून 6 (10.72टक्के) तसेच Gadyaraja आणि Sarvadnya and his Philosophy या शिर्षकाँची प्रत्येकी 2 (3.57टक्के) एकुण मिळून 4 (7.14टक्के) आणि ईतर अनेक शिर्षकनुसार पुस्तके प्रकाशित केलेली आहे.

**तक्ता क्र. 12** संस्कृत भाषेनुसार महानुभाव साहित्य शिर्षकांचा गोषवारा

| अ.क्र. | ग्रंथांचे शिर्षक | शिर्षक संख्या | पुस्तके संख्या | एकुण पुस्तके | टककेवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्रीक्षेत्र डोमेग्राम संस्कृत दर्शन | १ | ३ | ३ | ६.५२ |
| २ | श्रीमद्‌भगवतगीता | १ | २ | २ | ४.३५ |
| ३ | वेगवेगळया शिर्षकानुसार प्रकाशित झालेल्या पुस्तकांची संख्या | ४१ | १ | ४१ | ८९.१३ |
| | **एकुण पुस्तके** | | | **४६** | **१००.००** |

वरील तक्ता क्र. 12 प्रमाणे संस्कृत भाषेनुसार महानुभाव साहित्यातील वेगवेगळया शिर्षकाप्रमाणे महानुभाव साहित्य प्रकाशित केलेली आहे. एकुण 2452 साहित्यपैकी संस्कृत भाषेनुसार सर्व शिर्षकाँची 46 (1.88टक्के) पुस्तके प्रकाशित केलेली आहे. यामध्ये सर्वाधिक श्रीक्षेत्र डोमेग्राम संस्कृत दर्शन या शिर्षकाँची 3 (6.52टक्के) पुस्तके तर श्रीमद्दभगवद्दगीता या षिर्शकांची 2 (4.35टक्के) तसेच वेगवेगळया शिर्षकानुसार प्रकाशित झालेली पुस्तकांची संख्याप्रमाणे शिर्षकाँची प्रत्येकी 1 (2. 17टक्के) एकुण मिळून 41 (89.13टक्के) पुस्तके प्रकाशित केलेली आहे.

**तक्ता क्र. 13** सकळ लिपी भाषेनुसार महानुभाव साहित्य शिर्षकांचा गोषवारा

| अ.क्र. | ग्रंथांचे शिर्षक | शिर्षक संख्या | पुस्तके संख्या | एकुण पुस्तके | टककेवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | सकळ लिपी अभ्यास | १ | ३ | ३ | ३७.५० |
| २ | सुत्रपाठ | १ | २ | २ | २५.०० |
| ३ | दृष्टान्तस्थळ | १ | १ | १ | १२.५० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | महानुभाव सांकेतिक सुन्दरा लिपीचा अभ्यास | १ | १ | १ | १२.५० |
| ५ | महावाक्य निर्वचन महाभाष्य | १ | १ | १ | १२.५० |
| **एकुण पुस्तके** | | | | **८** | **१००.००** |

वरील तक्ता क्र. 13 प्रमाणे सकळ लिपी भाषेनुसार महानुभाव साहित्यातील वेगवेगळया शिर्षकाप्रमाणे महानुभाव साहित्य प्रकाशित केलेली आहे. एकुण 2452 साहित्यपैकी सकळ लिपी भाषेनुसार सर्व शिर्षकाँची 8 (0.32टक्के) पुस्तके प्रकाशित केलेली आहे. यामध्ये सर्वाधिक सकळ लिपी अभ्यास या षिर्शकांची 3 (37.50टक्के) पुस्तके तर सुत्रपाठ या षिर्शंकांची 2 (25.50टक्के) तसेच दृष्टान्तस्थळ, महानुभाव सांकेतिक सुन्दरा लिपीचा अभ्यास आणि महावाक्य निर्वचन महाभाष्य या शिर्षकाँची प्रत्येकी 1 (12.50टक्के) एकुण मिळून 3 (37.50टक्के) पुस्तके प्रकाशित केलेली आहे.

**तक्ता क्र. 14** पंजाबी भाषेनुसार महानुभाव साहित्य शीर्षक गोशवारा

| **अ.क्र.** | **ग्रंथांचे शिर्षक** | **शिर्षक संख्या** | **पुस्तके संख्या** | **एकुण पुस्तके** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|---|---|
| १ | पंजाबी श्रीचक्रधर चरित्र | १ | १ | १ | ५०.०० |
| २ | भजनामृत | १ | १ | १ | ५०.०० |
| **एकुण पुस्तके** | | | | **२** | **१००.००** |

वरील तक्ता क्र. 14 प्रमाणे पंजाबी भाषेनुसार महानुभाव साहित्यातील वेगवेगळया षिर्शकाप्रमाणे महानुभाव साहित्य प्रकाशित केलेली आहे. एकुण 2452 साहित्यपैकी पंजाबी भाषेनुसार शिर्षक 2 (0.08टक्के) पुस्तके प्रकाशित केलेली आहे. यामध्ये पंजाबी श्रीचक्रधर चरित्र आणि भजनामृत या शिर्षकांची प्रत्येकी 1 (50.00टक्के) एकुण मिळून 2 (100.00टक्के) पुस्तके प्रकाशित केलेली आहे.

**तक्ता क्र. 15** गुजराती भाषेनुसार महानुभाव साहित्य शिर्षक गोशवारा

| **अ.क्र.** | **ग्रंथांचे शिर्षक** | **शिर्षक संख्या** | **पुस्तके संख्या** | **एकुण पुस्तके** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|---|---|
| १ | देह झाला चंदनाचा गुजराती आवृत्ती | १ | १ | १ | ५०.०० |
| २ | लीळाचरित्र गुजराती | १ | १ | १ | ५०.०० |
| **एकुण पुस्तके** | | | | **२** | **१००.००** |

वरील तक्ता क्र. 15 प्रमाणे गुजराती भाषेनुसार महानुभाव साहित्यातील वेगवेगळे शिर्षकाप्रमाणे महानुभाव साहित्य प्रकाशित केलेली आहे. एकुण 2452 साहित्यपैकी गुजराती भाषेनुसार  शिर्षक 2 (0.08टक्के) पुस्तके प्रकाशित केलेली आहे. यामध्ये देह झाला चंदनाचा गुजराती आवृत्ती आणि लीळाचरित्र गुजराती या शिर्षकांची प्रत्येकी 1 (50.00टक्के) एकुण मिळून 2 (100.00टक्के) पुस्तके प्रकाशित केलेली आहे.

## 10. निष्कर्ष

महानुभाव साहित्य 7 भाषेत प्रकाशित असून महाराष्ट्र एकुण 2452 पुस्तके उपलब्ध आहेत. त्यापैकी मराठी 2020, हिंदी 318, इंग्रजी 56, संस्कृत 46, सकळ लिपी 8, पंजाबी 2 आणि गुजराती 2 पुस्तके आहेत. मराठी लेखक बाभूळगावकर भोजराज उपाध्य बा.भो. शास्त्री 86 आणि शिर्षक श्रीमद्‌भगवद्‌गीता 54, हिंदी लेखक  गीता प्रेस संपादक 27 आणि शीर्षक श्रीमद्‌भगवद्‌गीता 22, इंग्रजी लेखक बी. जी. जाधव 11 आणि शीर्षक श्रीमद्‌भगवद्‌गीता 18, संस्कृत लेखक विद्वांसबाबा आणि शेवलीकर मनोहर शास्त्री प्रत्येकी 3 आणि शीर्षक श्रीक्षेत्र डोमेग्राम संस्कृत दर्शन 3, सकळ लिपी लेखक आराध्ये राजधर 2 आणि शिर्षक सकळ लिपी अभ्यास 3, पंजाबी लेखक आराध्ये मुकंदराज व कृष्णदास महानुभाव संपादक प्रत्येकी 1 आणि शिर्षक पंजाबी श्रीचक्रधर चरित्र व भजनामृत, आणि गुजराती लेखक अंकुलनेरकर नरेंद्रमुनी व खेर राजेंद्र प्रत्येकी व शीर्षक देह झाला चंदनाचा गुजराती  आवृत्ती   आणि लीळाचरित्र गुजराती हे सर्व लेखक आणि शीर्षक यांची सर्वाधिक पुस्तके प्रकाशित झालेली आहे.

## संदर्भ ग्रंथ सूची

श्री. गोपीराज महानुभाव ग्रंथसंग्रहालय, रिध्दपुर, जिल्हा अमरावती.
आगलावे प्रदीपः सामाजिक संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे, श्री साईनाथ प्रकाषन, नागपुर, पाचवी आवृत्ती 2015.
कोलते वि.भि.: श्री चक्रधरचरित्र, अरून प्रकाषन, मलकापुर, बुलढाणा, द्वितीय आवृत्ती 1977.
कोलते वि.भि.: विचार बंद, राऊळ प्रकाषन, औरंगाबाद, 1989.
कोळपकर मुरलीधर शास्त्रीः महानुभाव इतिहास, राजविद्या आश्रम, लातुर प्रकाशान, प्रथम आवृत्ती 1978.

खामनीकर हंसराजः स्थान दर्शन, महानुभाव साहित्य प्रकाषन, माळवाडगाव, अहमदनगर, 2017.
खैरकर दिलीपः प्रगत सामाजिक संशोधन पध्दती व सांख्यिकी, डायमंड प्रकाषन, पुणे, मार्च 2011.
तायडे दिपक तुकारामः दृश्टांत पाठ, राऊळ प्रकाशन, महातिर्थराज डोमेग्राम, अहमदनगर, 2009.
तायडे दिपक तुकारामः लीळाचरित्र, एक चिकीत्सक अभ्यास भाग 1, राऊळ प्रकाशन, महातिर्थराज डोमेग्राम, अहमदनगर, 2010.
तुळपुळे शं.गो.: महानुभाव पंथ व त्याचे वाङ्‍मय, व्हीनस प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, 1976.